MHRG110005202019

RCS No. 82/2019

## नियमित दिवाणी दावा क्र.८२/२०१९ मधील निशाणी ३५ खालील आदेश

**(हरीश्चंद्र कांबळे वगैरे वि. राजेश्री ढेपे वगैरे)**

वादीने प्रस्तुतचा अर्ज वादी यांचे वारस अभिलेखावर आणणेस विलंब झालेने आपोआप झालेला उपशम (Abatement) रद्द होवून मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

२. वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरुध्द मनाई हुकूमाकरिता व निरंतरच्या ताकिदीकरिता दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जान्वये वादीचे असे कथन आहे की, सदर दाव्यातील वादी क्र. १ हरिश्चंद्र मारुती कांबळे हे दि. १४.१०.२०२४ रोजी मौजे मेढे, ता. तळा, जि. रायगड येथे मयत झाले आहेत. वादीच्या मृत्यूमुळे दाव्यास असलेले कारण नष्ट झालेले नाही. त्यामुळे सदरकामी वादीचे वारस दाव्याकामी दाखल करणे आवश्यक आहे. वादी यांच्या मृत्यूमुळे त्यांचे वारसांना मानसिक धक्का बसला. तसेच वादी यास सदर कायदेशीर बाबींचे ज्ञान नसल्यामुळे वादी क्र. १ यांचे वारस मुदतीत दाखल करणे शक्य झाले नाही व त्याबाबतचा दुरुस्ती अर्ज दाखल करता आला नाही. सबब, वादीने प्रस्तुत अर्जान्वये उपशम रद्द होवून मिळणेची विनंती केलेली आहे.

३. प्रतिवादींनी प्रस्तूत अर्जावरच म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, सदरचा अर्ज वादी यांनी दि. २८.०१.२०२५ रोजी मे. कोर्टात दाखल केलेला असुन सदरचे अर्जावर वादी यांनी अथवा त्यांचे वकील यांनी सही केलेली नाही. विना सहीचे अर्जास मे. न्यायालयाने निशाणी क्र. ३५ दिलेला आहे. अर्जातील मजकूर प्रतिवादीला मान्य व कबूल नाही. अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली.

४. निशाणी ३५ कडील अर्ज, त्या पुष्ट्यर्थ दाखल केलेले प्रतिज्ञापत्र यांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादींतर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. वादीने प्रस्तुत अर्जान्वये वादी हरिश्चंद्र मारुती कांबळे यांचे वारस अभिलेखावर घेणेस विलंब झालेने त्यांचे विरुध्दचा दावा उपशम रद्द होवून मिळणेबाबत विनंती केलेली आहे. वादीचे असे कथन आहे की, वादीचे वारसांना मयत वादी अथवा प्रतिवादी यांचे वारस रेकॉर्डवर आणावे लागतात या कायदेशीर बाबींची माहिती नसलेने व सदरील वादींचे वारस हे वादी मयत झालेने त्या दुखात असलेने वारस मुदतीत अभिलेखावर घेता आले नाहीत. प्रस्तुत दावा हा मिळकतीचे मनाई हुकूमाकरिता व निरंतरच्या ताकिदीकरिता दाखल केला आहे. तसेच दाव्याचा गुणदोषांवर निपटारा होणेकरिता व दाव्याचे स्वरुप विचारात घेता न्यायहिताच्या दृष्टीने प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

निशाणी ३५ वरील अर्ज वादीने प्रतिवादी यांना र.रु.१००/– खर्च देणेचे अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

SONTAKKE AHILYABAI BALIRAM

Digitally signed by SONTAKKE AHILYABAI BALIRAM
Date: 2025.06.09 17:38:59 +0530

माणगाव. [श्रीमती अ.प्र.मानव(श्रीमती अ. ब. सोनटक्के)]

दिनांकः–०९.०६.२०२५. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, माणगाव.